तातडीचे/हस्ते बटवडा

# University of Mumbai


**प्रकाशन विभाग**
प्र.वि/आयसीडी/२०१८–१९/ ११८
कक्ष क्र. २२१,
मुंबई – ४०० ०३२.

दिनांक :– १८ मार्च, २०१९

**परिपत्रक :**

**सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्था व विभाग प्रमुख आणि संचालक**

**विषय : विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१५–१६, २०१६–१७, २०१७–१८, आणि २०१८–१९ या चार वर्षांचे वर्षवृत्त तयार करण्यासाठी वर्षनिहाय स्वंतत्रपणे माहिती पाठविण्याबाबत.**

विद्यापीठाचे सर्व संलग्नित महाविद्यालय, घटक महाविद्यालय, आदर्श महाविद्यालय, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाचे वर्षवृत्त तयार करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी समितीचे गठन केलेले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार,

> कलम १३६(१) : 'अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.'

कलम १३६(२) : ‘ (२) राज्य शासन, तो वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्याची व्यवस्था करील’

यानुसार आपणांस विनंती करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०१५–१६, २०१६–१७, २०१७–१८, २०१८–१९ या चार वर्षांकरिता विद्यापीठाचे वर्षवृत्त तयार करण्यासाठी आपल्या विभागांशी संबंधित माहिती पाठवावी.

सदर माहिती मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये देणे बंधनकारक आहे याची कृपया नोंद घ्यावी.

वर्षवृत्त मराठी व इंग्रजी मध्ये तयार केले जाणार आहे. माहिती दिनांक १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६, १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७, १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८, १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९, या काळातील असावी. माहिती पाठविताना कृपया खालील बाबींचे अवलोकन व्हावे.

१) अहवालविषयक वर्षात महाविद्यालयाने/विभागाने/संस्थेने देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरलेले तसेच ज्ञानक्षेत्रात लक्षणीय भर घालणारे अशा स्वरूपाचे जे विशेष उल्लेखनीय कार्य केले असेल त्याचा उल्लेख करावा. तसेच अहवालविषयक वर्षात महाविद्यालयाने संशोधनाचे जे विशेष प्रकल्प हाती घेतले असतील त्यांचाही उल्लेख येथे करावा.

२) मान्यताप्राप्त संस्था व विभागाद्वारे नाविन्यपूर्ण उपक्रम, संशोधन, पेटंट, कन्सलटन्सी, इत्यादी स्वरूपातील माहिती पाठवावी. राष्ट्रीय –आंतरराष्ट्रीय, युजीसी मान्यताप्राप्त जर्नल्स मध्ये प्रकाशित झालेले शोधनिबंध यांचा समावेश करण्यात यावा.

| अ.क्र. | महाविद्यालय/विभाग/ संस्था | शिक्षकाचे नाव व पदनाम | प्रकाशित झालेले शोधनिंबध/ पेटंट/ पुस्तके/ प्रकाशन/ कन्सलटन्सी, |
|---|---|---|---|

३) मंजूर झालेले प्रकल्प, अध्यासन, विविध योजना, मंजूर झालेले ग्रॅन्टस् (शासकीय/निमशासकीय), नामांकीत संस्थेकडून प्राप्त झालेले अनुदान, यांचा समावेश करण्यात यावा.

४) संशोधन केंद्राबदद्लची माहिती

| अ. क्र. | महाविद्यालय/विभाग/ संस्था | पी.एच.डी. गाईड नाव | विषय | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश |
|---|---|---|---|---|---|

५) अनुदानाबद्दलची माहिती

| अ.क्र. | महाविद्यालय/ विभाग/ संस्था | मंजूर झालेले अनुदान/संशोधन पायाभूत | शासकीय/ बिगर शासकीय |
|---|---|---|---|
| | | | |

६) महाविद्यालयाने भरावयाची माहिती

| अ. क्र. | महाविद्यालय/ विभाग/ संस्था | NAAC Accredtion | Grade | Validity | Email id & Website |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सुचना:

१. माहिती फक्त ई–मेल द्वारे स्वीकारण्यात येईल. त्यासाठीचा ई–मेल आयडी पुढीलप्रमाणे :– **fortpublication@gmail.com**
२. माहिती पाठवितांना मराठी साठी– कृतीदेव ५०/ Unicode, Font size– १८ व इंग्रजीसाठी Times New Roman, Font size– १४ Word File मध्ये पाठवावी.
३. माहिती पाठवितांना त्या– त्या शैक्षणिक वर्षाचा ठळकपणे उल्लेख करण्यात यावा.
४. कृपया माहिती दिनांक ३० एप्रिल २०१९ पर्यंत पाठवावी. (माहिती फक्त ई–मेलद्वारे स्वीकारण्यात येईल कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी)
५. सदर परिपत्रक मुंबई विद्यापीठाच्या www.mu.ac.in – या संकेतस्थळावरील Circular Link अंतर्गत Publication Section येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मुंबई ४०० ०३२

दि. १८ मार्च, २०१९.

डॉ. अजय देशमुख
(कुलसचिव)

Minalpc/data/minal/circular forcollegedpet2015-19